**MHRG110001442025**

**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ३६/२०२५ मधील निशाणी क्र. ०५ वर आदेश</u>**
**<u>(पारीत दिनांक ०७.०२.२०२५)</u>**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी तात्पुरत्या निरंतर हुकुमाचा आदेश पारीत करण्यात यावा याकरिता सादर केला आहे. वादींनी अशी विनंती केली आहे की, तात्पुरत्या निरंतर हुकूमाचा एकतर्फी आदेश पारीत करण्यात यावा.

२. वादीने नमुद केले की, प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये प्रतिवादीतर्फे वादीने दिनांक २७.०१.२०२५ रोजी बेकायदेशीर नोटीस देवुन तात्काळ अतिक्रमित बांधकाम काढुन टाकावे अन्यथा नगरपंचायतीमार्फत बांधकाम काढण्यात येईल. वादीच्या वकीलांनी असा युक्तीवाद केला की, दिनांक २७.०१.२०२५ रोजीच्या नोटीसच्या आधारे कारवाई केली गेल्यास वादीच्या दाव्याचा हेतु सफल होणार नाही. म्हणुन पुढील तारखेपर्यंत एकतर्फा मनाई हुकुमाचा आदेश पारीत करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. दाव्यातील कथने, वादीचे म्हणणे व अभिलेखावरील दस्तऐवज विचारात घेता असे दिसुन येते की, दावा हा ठरावाकरिता, निरंतर हुकूमाच्या ताकीदीकरिता व मनाई हुकूमाच्या ताकीदीकरिता दाखल करण्यात आलेला आहे. प्रतिवादी हे नगरपंचायत माणगांव असल्याचे दस्तऐवजावरुन दिसून येते. तसेच निशाणी क्र. ४ वरील यादीसमवेत अनुक्रमांक १ वरील दिनांक २७.०१.२०२५ रोजी प्रतिवादीने नोटीस पाठवुन वादीचे बांधकाम तात्काळ हटविण्यास सांगितले. अन्यथा कारवाई केली जाईल असे देखील

नमुद केले.

४.  निशाणी क्र. ४ वरील यादीसमवेत दस्तऐवजाची सादर केलेल्या दस्ताची, अभिलेखावरील छायाचित्रांची पाहणी केली असता दिसून येते की, मागील तारखेला दाखल केलेल्या छायाचित्रांची आजरोजी प्रिंट काढल्याचे आजरोजी दाखल केलेल्या छायाचित्रांवरुन दिसुन येत आहे.

५.  प्रस्तुत प्रकरणातील नोटीस दिनांक २७.०१.२०२५ रोजी पाठविल्याची दिसुन येत आहे. सदर नोटीसमध्ये तात्काळ प्रतिवादीने नोटीस पाठवुन वादीचे बांधकाम तात्काळ हटविण्यास सांगितले. अन्यथा कारवाई केली जाईल असे देखील नमुद केले आहे. वादींनी दाखल केलले दस्तऐवज आजच्या परिस्थितीमध्ये नेमकी दावा मिळकतीची स्थिती काय आहे हे स्पष्ट होत नाही. दिनांक २७.०१.२०२५ च्या नोटीसद्वारे आजरोजीपर्यंत म्हणजे दिनांक ०७.०२.२०२५ रोजीपर्यंतच्या कालावधीमध्ये कारवाईची शक्यता झाल्याचे नाकारता येत नाही. म्हणुन दाव्याची परिस्थिती जशी आहे तशी ठेवण्याचा व एकतर्फा तात्पुरत्या निरंतर हुकूमाचा ताकीदीचा आदेश पारीत केल्यास तो निष्क्रीय ठरु शकतो. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी व प्रतिवादी मार्फत कोणीही दावामिळकतीमधुन वादीला काढण्यात येवु नये असा तात्पुरत्या निरंतर हुकूमाचा आदेश पारीत करणे योग्य व रास्त होणार नाही. प्रतिवादीचे म्हणणे निशाणी क्र. ५ खालील अर्जावर घेतल्यानंतर आदेश पारीत करणे योग्य व रास्त आहे. सदर परिस्थितीत प्रतिवादीला संधी न देता एकतर्फा आदेश पारीत करणे योग्य होणार नाही. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांना त्यांच्याविरुध्द तात्पुरत्या निरंतर हुकूमाचा आदेश का पारीत करण्यात येऊ नये याचे कारण सादर करण्यासाठी सुचनापत्र पाठविण्यात यावे.

GAJANAN CHANDRAKANT FULZALKE

Digitally signed by GAJANAN CHANDRAKANT FULZALKE
Date: 2025.02.07 13:56:08 +0530

माणगांव, (जी. सी. फुलझळके)

दिनांक – ०७.०२.२०२५ सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, माणगांव